016


# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग
ईमेल- nagarsachiv.mbmc.gmail.com


जा.क्र.मनपा/सचिव/माहिती अधिकार/90 /2021 दिनांक :- 10 / 2 /2021

प्रति,
श्रीमती अन्नु पाटील,
03, डायमंड अपार्टमेंट,
गोम्स स्ट्रीट, भाईंदर (प.)
जि. ठाणे.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सदस्य नियुक्तीची माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- 1) आपणांकडील दि. 29/01/2021 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.
(नगरसचिव कार्यालयास प्राप्त दि. 01/02/2021)
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./10/2021, दि. 01/02/2021.

महोदया,

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्रान्वये आपण परिवहन सदस्य नियुक्तीबाबत महाराष्ट्र शासन मार्गदर्शक तत्वे, नियम, आदेश, शासन निर्णय तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सदस्यांनी सादर केलेले केलेले अर्ज व सोबतची कागदपत्रं, नियुक्ती पत्र या कागदपत्रांच्या सत्यप्रतींची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणांस उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या माहितीपोटी संदर्भिय पत्र क्र. 02 अन्वये प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 336 पानांकरिता रुपये 672/- (अक्षरी रुपये सहाशे बाहत्तर मात्र) इतके शुल्क महानगरपालिका फंडात भरणा करणेबाबत कळविले होते. त्यानुसार आपण रुपये 672/- इतके शुल्क पावती क्र. 150527 अन्वये दि. 05/02/2021 रोजी महानगरपालिका फंडात भरणा केल्याने, आपणांस संदर्भितय पत्र क्र. 02 मध्ये नमुद परिवहन सदस्य नियुक्तीबाबत महाराष्ट्र शासन मार्गदर्शक तत्वे, नियम, आदेश, शासन निर्णय तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सदस्यांनी सादर केलेले केलेले अर्ज व सोबतची कागदपत्र, नियुक्ती पत्र व दि. 9/9/2019 रोजीच्या मा. विशेष महासभेचे इतिवृत्तांत या कागदपत्रांच्या सत्यप्रती या पत्रासोबत जोडून देत आहोत. (एकूण पाने 336)

उक्त माहिती नगरसचिव विभागात उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरुन देण्यात आली आहे. सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

10/2/21

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9967481732)

Y.D.Bhoir
10/02/2021

010

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग
ईमेल- nagarsachiv.mbmc.gmail.com

जा.क्र.मनपा/सचिव/माहिती अधिकार/90 /2021 दिनांक :- 09 /02 /2021

प्रति,
श्रीमती अन्नु पाटील,
03, डायमंड अपार्टमेंट,
गोम्स स्ट्रीट, भाईंदर (प.)
जि. ठाणे.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सदस्य नियुक्तीची माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 29/01/2021 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.
(नगरसचिव कार्यालयास प्राप्त दि. 01/02/2021)

महोदया,

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्रान्वये आपण परिवहन सदस्य नियुक्तीबाबत महाराष्ट्र शासन मार्गदर्शक तत्वे, नियम, आदेश, शासन निर्णय तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सदस्यांनी सादर केलेले केलेले अर्ज व सोबतची कागदपत्र, नियुक्ती पत्र या कागदपत्रांच्या सत्यप्रतींची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपल्या पत्रातील मुद्देनिहाय नगरसचिव विभागाच्या अभिलेखी उपलब्ध असलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या सत्यप्रती पुढीलप्रमाणे आपणांस उपलब्ध करुन देत आहोत.

| मुद्दा क्र. | कागदपत्रांचा तपशिल | एकुण पाने |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 2 कलम 25 परिवहन समितीची नेमणूकी संदर्भात तरतुद असून, अधिनियमाच्या पुस्तकातील पान क्र. 105 व 106 ची सत्यप्रत देत आहोत. | 02 |
| 2 | उमेदवारांनी सादर केलेले अर्ज व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती<br>उमेदवारांची नावे :- | |
| | 1. श्री. अन्सारी रशिद अन्वर | 45 |
| | 2. श्री. उपाध्याय देविप्रसाद जगन्नाथ | 27 |
| | 3. श्री. जागुष्टे अविनाश अरविंद | 28 |
| | 4. श्री. टॉमस अंतोन ग्रेसीयस | 26 |
| | 5. श्री. दिलीप रुपचंद जैन | 24 |
| | 6. श्री. पाटील विशाल रघूनाथ | 25 |
| | 7. श्री. मंगेश आत्माराम पाटील | 23 |
| | 8. श्री. म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | 27 |
| | 9. श्री. राजकुमार देवनारायण मिश्रा | 27 |
| | 10. श्री. लक्ष्मण बुधाजी कांदळगावकर | 27 |
| | 11. श्रीम. वनिता शंकर बने | 29 |
| | 12. श्री. शिवशंकर सत्यनारायण तिवारी | 25 |
| 3 | परिवहन समितीवर सदस्य नेमणूकीबाबतच्या घोषणेची सत्यप्रत. | 01 |
| | एकूण | 336 |

यासाठी लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 336 पानांकरिता रुपये 672/- (अक्षरी रुपये सहाशे बाहत्तर मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9967481732)

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.व./न.प्र./मा.अ.प.
आवक क्र. ७०/२०२१
दिनांक :- ०१/०२/२०२१

# केंद्रशासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

## नमुनापत्र - ३

### माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

कोर्ट फी / COURT FEE — 10 रु. / Rs.10 — भारत / INDIA — दस रुपये / TEN RUPEES

प्रति,
शासकिय माहिती अधिकारी,
परिवहन नगर सचिव,

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराचे नाव | | श्रीमती अन्नु पाटील |
| २) | पत्ता | :- | ०३, डायमंड अपार्टमेंट, गोमन स्ट्रीट, भाईंदर (प) जि. ठाणे. |
| ३) | आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल | :- | मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सदस्य नियुक्तांची माहिती |
| (एक) | माहितीचा विषय | :- | मिळणेबाबत. |
| (दोन) | माहितीशी संबधित कालावधी | :- | वरिलप्रमाणे. |
| (तीन) | आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन | :- | |

१) सदर परिवहन सदस्य नियुक्ती महाराष्ट्र शासन मार्गदर्शक तत्वे नियम आदेश, शासन निर्णय याची माहिती मिळावी.
२) प्रत्येक सदस्याने सादर केलेले अर्ज व त्यासोबत सदस्याने जोडलेली कागदपत्रं याच्या माहिती मिळावी
३) प्रत्येक सदस्याला दिलेले नियुक्ती पत्र (शेरे, टिप्पणी सह)

| | | | |
|---|---|---|---|
| (चार) | माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.) | :- | व्यक्तीशः |
| (पाच) | टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) | :- | — |
| (सहा) | ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन | :- | — |

ठिकाण :- भाईंदर

दिनांक :- २९।९।२०२१

(स्वाक्षरी)
७९९९९९१३४५
अर्जदाराची स्वाक्षरी

करण्यास सक्षम असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी आपले अधिकार व कर्तव्ये यांपैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये वेळोवेळी अशा समितीकडे सोपवता येतील किंवा अशा कोणत्याही समितीकडे अशी बाब निकालात काढण्याकरिता किंवा त्यावर प्रतिवृत्त सादर करण्याकरता पाठवता येईल आणि अशा प्रत्येक विशेष समितीने स्थायी समितीकडून तिला याबाबत वेळोवेळी जे कोणतेही अनुदेश देण्यात येतील ते पाळले पाहिजेत :

परंतु स्थायी समितीने अशा प्रत्येक ठरावाचे प्रतिवृत्त महानगरपालिकेकडे शक्य तितक्या लवकर पाठवले पाहिजे, आणि महानगरपालिकेस, असा ठराव कोणत्याही वेळी रद्द करता येईल.

(२) स्थायी समितीस, नियमांच्या अधीन राहून, याबाबतच्या विशिष्ट ठरावाद्वारे आपले अधिकार व कर्तव्ये यांपैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये उपसमित्यांकडे सोपवता येतील. अशा उपसमित्यांत स्थायी समितीस योग्य वाटतील असे तिच्या सदस्यांपैकी कमीत कमी तीन सदस्य असतील आणि अशा प्रत्येक उपसमितीने स्थायी समितीकडून तिला वेळोवेळी जे कोणतेही अनुदेश देण्यात येतील ते पाळले पाहिजेत.

## परिवहन समिती

**२५. परिवहन समितीची नेमणूक.–**

(१) महानगरपालिकेने परिवहन उपक्रम संपादन किंवा स्थापन केल्यास या अधिनियमाच्या तरतुदींनुसार व त्यात असलेल्या शर्ती व मर्यादा यांस अधीन राहून असा उपक्रम चालवण्याच्या प्रयोजनासाठी [१][तेरा] सदस्यांची एक परिवहन समिती असेल.

(२) महानगरपालिकेने परिवहन उपक्रम संपादन किंवा स्थापन केल्यानंतर आपल्या पहिल्या सभेत महानगरपालिकेच्या मते ज्यांना प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्यिक, वित्तीय किंवा कामगारविषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल व जे पालिका सदस्य असतील वा नसतील अशा व्यक्तींमधून परिवहन समितीचे सदस्य म्हणून [२][बारा] व्यक्तींची नेमणूक केली पाहिजे.

(३) जर एखादी व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास व पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह असेल तर ती व्यक्ती परिवहन समितीचा सदस्य म्हणून नेमली जाण्यास व सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरेल.

(४) स्थायी समितीचा सभापती हा परिवहन समितीचा पदसिद्ध सदस्य असेल.

(५) महानगरपालिकेने नेमणूक केलेल्या परिवहन समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य प्रत्येक दुसऱ्या वर्षी पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेली सभा ज्या महिन्यात भरली असेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस निवृत्त होतील.

[३][परंतु, परिवहन समितीचा सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या पालिका सदस्याच्या बाबतीत, त्याच्या निवृत्तीच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी तो पालिका सदस्य असण्याचे बंद होईल तर, तो परिवहन समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल, आणि त्यानंतर त्याचे पद रिकामे होईल. उक्त रिकामे पद, जणू काही ते कलम २६ अन्वये रिकामे झाले असल्याप्रमाणे, पोट-कलम (९) च्या तरतुदींनुसार भरण्यात येईल.]

(६) पोट-कलम (२) अन्वये सदस्यांच्या नेमणुकीनंतर दोन वर्षांनी जे सदस्य निवृत्त होतील त्यांची निवड त्यांच्या निवृत्तीच्या निकटपूर्वीच्या महिन्यांच्या पहिल्या तारखेपूर्वी परिवहन समितीचा सभापती ठरवील अशा वेळी व अशा रीतीने चिठ्ठ्या टाकून करण्यात येईल. त्यानंतर परिवहन समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळपर्यंत असतील ते निवृत्त होतील :

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिक...

परंतु, पुन्हा नेमण्यात आलेल्या सदस्याच्या बाबतीत, या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी त्याचा पदावधी ज्या तारखेस त्याची पुन्हा नेमणूक करण्यात आली असेल त्या तारखेपासून मोजण्यात येईल.

(७) पोट-कलम (५) अन्वये सदस्यांच्या निवृत्तीमुळे रिकाम्या होणाऱ्या जागा महानगरपालिकेने अशा जागा रिकाम्या होण्याच्या निकटपूर्वीच्या महिन्यातील आपल्या सर्वसाधारण सभेत त्यावर यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तींची नेमणूक करून भरल्या पाहिजेत.

परंतु, ज्या वर्षी पालिका सदस्यांच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या असतील त्या वर्षी अशा निवडणुकांनंतर महानगरपालिकेची पहिली सभा अशा जागा रिकाम्या झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत भरणार असेल तर, अशा रिकाम्या जागा अशा पहिल्या सभेत भरल्या पाहिजेत, आणि अशा प्रसंगी जे सदस्य पोट-कलम (५) अन्वये, यात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस निवृत्त झाले असते ते या पोट-कलमान्वये नवीन सदस्यांची नेमणूक करण्यात येईपर्यंत पदावर राहतील.

(८) निवृत्त होणारा सदस्य फेरनेमणुकीस पात्र असेल.

(९) परिवहन समितीचा सदस्य म्हणून नेमणूक केलेल्या कोणत्याही व्यक्तीने पदाचा स्वीकार न केल्यास किंवा अशा समितीचा सदस्य मरण पावल्यास, त्याने राजीनामा दिल्यास किंवा तो अनर्ह ठरल्यास किंवा तो काम करण्यास असमर्थ झाल्यास किंवा कलम २६ च्या तरतुदींन्वये त्याचे पद रिकामे झाल्यास अशी रिकामी झालेली जागा महानगरपालिकेने त्या जागी यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करून सोईस्करपणे शक्य तितक्या लवकर भरली पाहिजे आणि अशी व्यक्ती ज्या व्यक्तीच्या जागी तिची नेमणूक करण्यात आली असेल त्या व्यक्तीने ती जागा रिकामी झाली नसती तर ज्या मुदतीपर्यंत पद धारण केले असते त्याच मुदतीपर्यंत पद धारण करील.

**सुधारणा**

१. "नऊ" या शब्दांऐवजी हा शब्द, सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, क. १६(अ) अन्वये दाखल करण्यात आला.

२. "आठ" या शब्दांऐवजी हा शब्द, सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, क. १६(ब) अन्वये दाखल करण्यात आला.

३. हे परंतुक सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, क. ७ अन्वये दाखल करण्यात आले.

**२६. परिवहन समितीच्या सदस्यांच्या अनर्हता.–**

(१) जी कोणतीही व्यक्ती परिवहन समितीचा सदस्य म्हणून तिची नेमणूक झाल्यावर-

(अ) कलम २५, पोट-कलम (३) च्या तरतुदींन्वये समितीचा सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरेल, किंवा

(ब) ज्या बाबतीत तिचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्षपणे कलम १० पोट-कलम (२), खंड (ब) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे असलेला कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल किंवा ज्या बाबतीत तिचा पक्षकाराच्या, प्रकर्त्यांच्या किंवा अन्य व्यक्तीच्या वतीने व्यवसायदृष्ट्या हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबींसंबंधी चर्चा चालू असताना त्या वेळी मत देऊन किंवा तीत भाग घेऊन किंवा अशा बाबीसंबंधी कोणताही प्रश्न विचारून समितीचा सदस्य म्हणून काम करील, किंवा

(क) तात्पुरता आजार किंवा समितीने मान्य केलेले कोणतेही अन्य कारण याव्यतिरिक्त अन्य प्रसंगी लागोपाठ दोन महिन्यांच्या मुदतीत समितीच्या सभांना स्वतः अनुपस्थित राहील, किंवा

(ड) कोणत्याही कारणामुळे- मग ते समितीने मान्य केलेले असो वा नसो- लागोपाठ चार महिन्यांच्या मुदतीत समितीच्या सभांना स्वतः अनुपस्थित राहील किंवा उपस्थित राहण्यास असमर्थ होईल; ती व्यक्ती समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल आणि त्यानंतर तिचे पद रिकामे होईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणतीही जागा रिकामी झाली आहे किंवा काय याविषयी कोणतीही शंका किंवा विवाद उद्भवल्यास आयुक्ताने महानगरपालिकेच्या विनंतीवरून तो प्रश्न न्यायाधीशाकडे पाठविला पाहिजे.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि. 09/09/2019

### // घोषणा //

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन समितीवर सदस्य नियुक्तीसाठी प्रशासनाकडून निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यांत आला आहे. परिवहन समितीवर एकुण 12 (बारा) सदस्यांचे नामनिर्देशन करावयाचे असून, उमेदवार हे देखील 12 (बारा) आहेत. करिता पुढील उमेदवार हे परिवहन समितीवर बिनविरोध नामनिर्देशित झाल्याचे मी घोषीत करीत आहे.

| अ.क्र. | परिवहन समितीवर नामनिर्देशित सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री. अन्सारी रशिद अन्वर |
| २ | श्री. उपाध्याय देविप्रसाद जगन्नाथ |
| ३ | श्री. जागुष्टे अविनाश अरविंद |
| ४ | श्री. टॉमस अंतोन ग्रेसीयस |
| ५ | श्री. दिलीप रुपचंद जैन |
| ६ | श्री. पाटील विशाल रघूनाथ |
| ७ | श्री. मंगेश आत्माराम पाटील |
| ८ | श्री. म्हात्रे राजेश हरिश्चंद्र |
| ९ | श्री. राजकुमार देवनारायण मिश्रा |
| १० | श्री. लक्ष्मण बुधाजी कांदळगावकर |
| ११ | श्रीम. वनिता शंकर बने |
| १२ | श्री. शिवशंकर सत्यनारायण तिवारी |

परिवहन समितीवर नामनिर्देशीत झालेल्या सदस्यांची मुदत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार असेल.

Dmehta

पिठासीन अधिकारी तथा महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. ०९/०९/२०१९**

आज सोमवार दि. ०९/०९/२०१९ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०३ दि. २७/०८/२०१९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | डिम्पल विनोद मेहता | महापौर |
| २) | चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ४) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ५) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ६) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ७) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ८) | पांड़ेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ९) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| १०) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १४) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १५) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १६) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १९) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| २०) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २१) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २२) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २३) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २४) | जैन गीता भरत | सदस्या |
| २५) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २६) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २७) | मोक़ाशी दिपाली आनंदराव | सदस्या |



माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| २८) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| २९) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ३०) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३१) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३२) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३३) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३४) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३५) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ३६) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ३७) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ३८) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ३९) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४०) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४१) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४२) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४३) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ४४) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४५) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४६) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ४७) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ४८) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ४९) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ५०) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५१) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५२) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५३) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५४) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५५) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ५६) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ५७) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ५८) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ५९) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६०) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६१) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६२) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६३) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ६४) | भट दीप्ती शेखर | सदस्या |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

| | | |
|---|---|---|
| ६५) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ६६) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६७) | भावसार वंदना संजय. | सदस्या |
| ६८) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ६९) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७०) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७१) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ७२) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ७३) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ७४) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ७५) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ७६) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ७७) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| ७८) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ७९) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

गैरहजर सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १) | व्यास रवि वासुदेव | सभापती, स्थायी समिती |
| २) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ३) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| ४) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| ५) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ६) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ७) | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | सदस्या |
| ८) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ९) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| १०) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ११) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| १२) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| १३) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| १४) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| १५) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| १६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |

रजेचा अर्ज - निरंक

**मा. महापौर :-**
सचिव महोदय सभेचे कामकाज सुरु करा.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा सोमवार दि. ०९/०९/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०३ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ५५, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ नियम २५(२)(३) अन्वये परिवहन समितीवर १२ (बारा) सदस्यांची नेमणूक करणे. परिवहन समिती सदस्यांची निवडीकरिता जो कार्यक्रम जाहिर करण्यांत आला होता त्यामध्ये दि. ०४/०९/२०१९ रोजी आपण परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करण्याकरिता नामनिर्देशन पत्र मागविण्यात आली होती. त्यावेळी एकूण १५ नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेली आहेत. त्यांची नावे मी वाचत आहे. १. श्री. टॉमस अंतोन ग्रेसीयस, २. श्री. मंगेश आत्माराम पाटील, ३. श्री. पाटील विशाल रघूनाथ, ४. श्री. अन्सारी रशिद अन्वर, ५. श्री. जागुष्टे अविनाश अरविंद, ६. श्री. लक्ष्मण बुधाजी कांदळगावकर, ७. श्री. शिवशंकर सत्यनारायण तिवारी, ८. श्री. म्हात्रे राजेश हरिश्चंद्र, ९. श्री. दिलीप रुपचंद जैन, १०. श्री. उपाध्याय देविप्रसाद जगन्नाथ, ११. श्री. राजकुमार देवनारायण मिश्रा, १२. श्रीम. वनिता शंकर बने, १३. श्री. शिवप्रकाश प्रल्हादाराय भुदेका, १४. श्री. शेट्टी उदय श्याम १५. श्री. सचिन काशिनाथ मांजरेकर, , अशी एकूण १५ नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेली होती. तद्नंतर गुरुवारी दि. ०५/०९/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजल्यानंतर प्राप्त नामनिर्देशन पत्रांची आपण छाननी केली. छाननी अंती सर्वच्या सर्व १५ नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे घोषित केलेले आहे. दि. ०६/०९/२०१९ रोजी सकाळी ११.०० ते १.०० ह्या दरम्यान आपण उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी कालावधी जाहिर केलेला होता. ह्या कालावधीमध्ये एकूण ३ उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतलेले आहे. त्यापैकी १. श्री. शिवप्रकाश प्रल्हादाराय भुदेका २. शेट्टी उदय श्याम ३. श्री. सचिन काशिनाथ मांजरेकर. एकूण १५ नामनिर्देशन पत्रांपैकी ३ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र मागे घेतल्यानंतर १२ नामनिर्देशन पत्र ही अंतिम उमेदवार म्हणून आपण जाहिर केलेली आहेत. परिवहन समितीवर १२ सदस्यांची निवड करण्याची तरतूद महापालिका कायद्यामध्ये आहे. त्यानुसार जागा एकूण १२ आहेत आणि उमदेवार देखील १२ शिल्लक राहिलेले आहेत. सबब निवडणूक घेण्याची आवश्यकता नाही आहे. त्यामुळे हे सदस्य बिनविरोध निवडून येणार आहेत. तर तशी घोषणा पिठासीन अधिकारी हे आता करणार आहेत.

**मा. महापौर :-**

मिरा भाईंदर महापालिकेच्या परिवहन समितीवर सदस्य नियुक्तीसाठी प्रशासनाकडून निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला आहे. परिवहन समितीवर एकूण १२ सदस्याचे नामनिर्देशन करावयाचे

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

असून उमेदवार हे १२ दाखील आहेत. पुढील उमेदवार हे परिवहन समितीवर बिनविरोध नामनिर्देशन झाल्याचे मी घोषित करीत आहे.

// घोषणा //

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन समितीवर सदस्य नियुक्तीसाठी प्रशासनाकडून निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यांत आला आहे. परिवहन समितीवर एकुण 12 (बारा) सदस्यांचे नामनिर्देशन करावयाचे असून, उमेदवार हे देखील 12 (बारा) आहेत. करिता पुढील उमेदवार हे परिवहन समितीवर बिनविरोध नामनिर्देशित झाल्याचे मी घोषीत करीत आहे.

| अ.क्र. | परिवहन समितीवर नामनिर्देशित सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री. अन्सारी रशिद अन्वर |
| २ | श्री. उपाध्याय देविप्रसाद जगन्नाथ |
| ३ | श्री. जागुष्टे अविनाश अरविंद |
| ४ | श्री. टॉमस अंतोन ग्रेसीयस |
| ५ | श्री. दिलीप रुपचंद जैन |
| ६ | श्री. पाटील विशाल रघूनाथ |
| ७ | श्री. मंगेश आत्माराम पाटील |
| ८ | श्री. म्हात्रे राजेश हरिश्चंद्र |
| ९ | श्री. राजकुमार देवनारायण मिश्रा |
| १० | श्री. लक्ष्मण बुधाजी कांदळगावकर |
| ११ | श्रीम. वनिता शंकर बने |
| १२ | श्री. शिवशंकर सत्यनारायण तिवारी |

परिवहन समितीवर नामनिर्देशीत झालेल्या सदस्यांची मुदत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार असेल.

सही/-
पिठासीन अधिकारी तथा महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली [illegible] सत्यप्रत



[illegible]
[illegible] विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर :-**

परिवहन सदस्य पदी निवडून आलेल्या सर्व सदस्यांना पुढील कारर्किदसाठी शुभेच्छा देत आहे. परिवहन समितीवर नामनिर्देशित झालेल्या सदस्यांची मुदत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी अनुसार असेल. सभेचे कामकाज पूर्ण झालेले आहे.

**नगरसचिव :-**

परिवहन समितीवर जे सदस्यांची निवड झालेली आहे. त्यांनी कृपया सभागृहात यायचे आहे. १२ सदस्यांना पुष्पगुच्छ देऊन सर्वांचे आभार मानून सभा समाप्त करण्यात आली.

**(सभा संपण्याची वेळ स. ११.४० वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
सत्यप्रत
मिरा भाईंदर महानगरपालिका

M.A.C. Form No. 2

See Rule 12, 110 (2) 114 116, (2) and 117, (1) (2) & (3)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

सर्वसाधारण पावती

पु. No.: 1506

पा. No. 150537

श्री मन अरुण पाटील यांच्याकडून [illegible] बद्दल

६०२१ रुपये (अक्षरी रु. [illegible] मात्र मिळाले)

दिनांक 05/02/2021

आ.क्र. [illegible] 2020-21

दि. [illegible]

लिपीकाची सही

प्राधिकृत अधिकाऱ्याची सही

रोकड वहीत नोंद केली.

पृष्ठ क्रमांक

लेखापाल / रोखपाल